# तोरण

अंक ८०-८१, एप्रिल-सप्टेम्बर २००९

संपादकीय
शिक्षण अधिकार कायदा २००९
मुक्त मूलभूत शिक्षण
तुम्हाला हे माहित आहे का?
मेंढपाळांसाठी विमा योजना
पशु विमा योजना
गोष्ट मानसोली कोंबडीच्या काटकपणाची
शेळीमेंढीपालनासाठी कर्ज मिळू शकेल
दोन कविता
अंतरातील घडामोडी

## संपादकीय

जरी शिक्षण अधिकार कायद्याखाली मोफत सक्तीचे शिक्षण हा मूलभूत हक्क असला तरी अजूनही अनेक गरीब व वंचित समाजातील मुलांना नियमितपणे शाळेला जाण्याचे स्वातंत्र्य मिळत नाही. याची अनेक कारणे आहेत व ती सर्वांना माहित आहेत. तथापि, स्थलांतर कराव्या लागणा-या समाजातील मुलांना सततच्या स्थलांतरामुळे शाळेत जाता येत नाही व त्यांच्या शिक्षणाचे हालच होतात. ही मुले पारंपरिक पशुपालक समाजातील असोत, बिगर पशुपालक समाजातील असोत किंवा स्थलांतर करणा-या कामगार वर्गातील असोत, हा महत्वाचा कायदा होऊनसुध्दा, नियमित शाळेपर्यंत पोहोचणे हेसुध्दा त्यांच्याकरता एक दूरचे स्वप्नच राहते.

देणगी मूल्य : रु. ५/-

दुस-या एका पातळीवर पाहता, जिथे शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत व जिथे स्थलांतर करणा-या समाजातील मुले शाळेपर्यंत पोहोचू शकतात तिथे ती बरेच वेळा नापास होतात. त्यांच्या रोजच्या जीवनाशी संपूर्णपणे अपरिचित असलेले अभ्यासक्रम, संकल्पना व शिकवण्याच्या पध्दती आणखीन भेदभाव निर्माण करतात व त्यांना शिक्षण सोडून द्यायला भाग पाडतात.

पारंपरिक व्यवसाय एका पिढीकडून पुढल्या पिढीकडे चालत येत असत व त्यामुळे पूर्वीच्या काळी शिक्षण व शिकणे बहुतांशी घरातल्या घरातच होत असे. आता पारंपरिक व्यवसायच हळूहळू नाहीसे होत चालले आहेत व परिणामी शिकण्याची ही पध्दतही नाहीशी होत चालली आहे.

आजकाल आधुनिक शास्त्र व तंत्र-शास्त्रावर आधारित करिअरवर जास्त भर दिला जात असल्यामुळे, आधुनिक शिक्षण पारंपरिक व्यवसायाकडे क्वचितच लक्ष देते. त्यामुळे वंचित समाजातील मुलांची वंचितपणाची भावना आणखीनच वाढते.

स्थलांतर करणा-या मेंढपाल सामाजातील मुलांचे अंतरा संस्थेने नुकतेच सर्वेक्षण केले आहे. त्यात मुलांच्या आकांक्षांची भरारी शिक्षक, कलाकार, शेतकरी, धनगर होण्यापासून डॉक्टर, इंजिनिअर, पोलिस व सैनिक व्हावे इथपर्यंत होती. ह्या करिअरच्या स्वप्नांच्या यादीत वास्तुशास्त्र व कायद्याचा अभ्यास ह्यांचा उल्लेख नव्हता.

वैयक्तिक कारणाकरता ज्या विद्यार्थ्यांना शाळा सोडावी लागली त्यापैकी ब-याचजणांनी मेंढीपालन म्हणजेच त्यांचा पारंपरिक व्यवसाय ही त्यांची पहिली निवड आहे असे सांगितले.

सुरूवातीला असे वाटत होते की १०वीची परिक्षा हा मुलांच्याकरता कदाचित मोठा अडथळा असेल व म्हणून शालेय शिक्षण पूर्ण होत नसेल. पण सर्वेक्षणातून असे लक्षात आले की मुलांना बरेच वेळा घरच्यांना उपजीविकेच्या कामात मदत करण्याकरता शाळा सोडावी लागते. अंतराचे सर्वेक्षण मेंढपाळांच्या मुलांच्या संदर्भात असल्यामुळे, इथे अर्थातच मेंढ्या पाळण्याकरता मुलांना शाळा सोडावी लागली असे आढळून आले.

मेंढीपालनासारख्या पारंपरिक व्यवसाया-करता किंवा शेती करण्याकरता औपचारिक शिक्षणाची गरज नाही हा मुद्दा पुढे येऊ शकतो. पण आजच्या झपाट्याने बदलणा-या जगाच्या संदर्भात, ह्या मुलांना त्यांच्या जीवनासंबंधात व उपजीविकेच्या साधनां-संबंधात महत्वाचे निर्णय घेता यावेत याकरता, शिक्षण घडवून आणणे हे एक आव्हानच आहे.

**डॉ. नित्या घोटगे**
संचालिका, अंतरा

## शिक्षण अधिकार कायदा

भारतीय संसदेने सप्टेम्बर २००९ मध्ये शिक्षण अधिकार बिल पास केले. ह्या कायद्यामध्ये ६ ते १४ वर्षांच्या वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण असावे अशी तरतूद आहे. इतर सर्व मानवी हक्कांचा वापर करण्याकरता शिक्षण हा आवश्यक व मूलभूत मानव अधिकार आहे असे युनेस्कोने घोषित केले आहे. आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या प्रौढांकरता व मुलांकरता गरिबीतून बाहेर येण्याकरता व नागरिक म्हणून पूर्णपणे सहभागी होण्याकरता शिक्षण हे एक शक्तिशाली साधन आहे हे युनेस्कोने मान्य केले आहे.

भारत सरकारच्या शिक्षण अधिकार कायद्यातली मुख्य वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत -

१. ६ ते १४ वयोगटातील मुलांना सक्तीचे मोफत शिक्षण
२. प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कुठल्याही मुलाला मागे ठेवले जाणार नाही, शाळेतून काढले जाणार नाही किंवा बोर्डाची परिक्षा पास होणे आवश्यक असणार नाही.
३. जी मुले प्राथमिक शिक्षण (इयत्ता १ ली ते ४ थी) पूर्ण करतील त्यांना सर्टिफिकेट दिले जाईल.
४. शिक्षक-विद्यार्थी प्रमाण ठराविक असावे.
५. सर्व खाजगी शाळांतून दुर्बल घटकांकरता पहिल्या इयत्तेच्या प्रवेशाकरता २५% जागा आरक्षित ठेवल्या जातील.
६. शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याचा आदेश.
७. आर्थिक बोजा केंद्र व राज्य सरकारकडून उचलला जाईल.

## मुक्त मूलभूत शिक्षण
### (Open Basic Education)

ह्या कार्यक्रमाद्वारे तीन पातळ्यांवर प्राथमिक शिक्षण दिले जाते - शाळा सोडलेली मुले (गळती), नव्याने साक्षर झालेली मुले, शाळेत न जाता बाहेरून अधिकृत संस्थांमधून शिकणारी मुले.

देशातल्या सर्व मुलांना, तरुणांना व प्रौढांना मूलभूत शिक्षण मिळावे याकरता भारत सरकारचे मानव संसाधन विकास मंत्रालय 'सर्व शिक्षण अभियान' ह्या कार्यक्रमाद्वारे प्रयत्नशील आहेत. राष्ट्रीय मुक्त विद्यालय (National Institute of Open Schooling) संस्थेने एक पर्यायी शैक्षणिक कार्यक्रम म्हणून मुक्त मूलभूत शिक्षण कार्यक्रमाची (Open Basic Education Programme) सुरूवात केली आहे. हा कार्यक्रम औपचारिक शिक्षण पध्दतीतील प्राथमिक

शिक्षण कार्यक्रमाच्या बरोबरीचा आहे. ज्यांच्यापर्यंत औपचारिक शिक्षण पोहोचत नाही त्यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचवण्याचा हा कार्यक्रम मुक्त मूलभूत शिक्षण कार्यक्रम, दूर शिक्षण पध्दतीच्या संभाव्यतांचा शोध घेतो व वापर करतो. राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्थेच्या पायाभूत शिक्षणक्रमाचा मुक्त मूलभूत शिक्षण कार्यक्रमात समावेश केला आहे. मुलांकरता व प्रौढांकरता वेगवेगळ्या मुक्त मूलभूत शिक्षण कार्यक्रमाची तरतूद आहे.

**मुक्त मूलभूत शिक्षण कार्यक्रमाचे ग्राहक खालीलप्रमाणे आहेत -**

१. १४ वर्षाखालील मुले

२. १४ वर्षावरील प्रौढ

**ह्या कार्यक्रमाची काही वैशिष्ट्ये -**

१. विषय निवडण्याचे स्वातंत्र्य

२. नेमून दिलेल्या पाठाचे पाठनिर्देशकांकडून मूल्यांकन

३. प्रवेश व परिक्षा याकरता ऑन लाईन नोंदणी

४. गुणांचा संचय करण्याची सुविधा

५. एक शिक्षणक्रम पूर्ण करण्यास ५ वर्षात ९ संधि

६. ५ वर्षानंतर परत प्रवेश मिळण्याची तरतूद

७. वैयक्तिक संपर्क कार्यक्रमाद्वारे (Personal Contact Programme) शिकण्याकरता सहाय्य

८. शिक्षणक्रमावर आधारित रेडिओ व टी.व्ही.वर प्रसारण

९. माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यावर हिंदी, इंग्लिश, उर्दू, मराठी, तेलगू, गुजराती व मल्याळी माध्यमातून शिक्षण

## तुम्हाला माहित आहे का ?

१. जरी तुमच्याकडे वीजेचे कनेक्शन नसेल किंवा तुमच्या भागात वरचेवर वीज कपात होत असेल तरी मोबाईल कसा चार्ज करायचा ह्याची चिंता करू नका. मोबाईल फोन तुम्ही सौर उर्जेवर चालणा-या चार्जरवर चार्ज करु शकता.

२. सौर उर्जेवर चालणारा मोबाईल चार्जरबरोबर दिवा याचे वेगवेगळे नमुने उपलब्ध आहेत.

३. स्थलांतर करत असलेल्या मेंढपाळांना वीजेची उपलब्धता नसते हे लक्षात घेऊन, अंतरा संस्थेने सौर उर्जेवर चालणारे मोबाईल चार्जर बरोबरचे दिवे असलेल्या चांगल्या नमुन्यांची निवड केली आहे. ते तुम्हाला अंतराच्या फलटण व रत्नागिरी ऑफिसमधून उपलब्ध करून दिले जातील.



# मेंढपाळांसाठी विमा योजना

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या प्रयत्नाने ११व्या पंचवार्षिक योजनेमध्ये, भारत सरकारच्या केंद्रीय लोकर विकास मंडळ, जोधपूर यांच्या अर्थसहाय्याने आणि भारतीय जीवन विमा निगम यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील मेंढपाळांसाठी विमा योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे यात मेंढपाळांच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्याची तरतूद आहे.

या योजनेमध्ये खालीलपैकी कोणीही भाग घेऊ शकतात.

- १९ ते ५९ या वयोगटातील मेंढपाळ
- दारिद्र्य रेषेखालील किंवा किंचित दारिद्र्य रेषेच्या वर असणारे मेंढपाळ
- ज्यांच्याकडे मेंढ्यांचा कळप आहे ते आणि जे प्रत्यक्ष मेंढीपालन व्यवसाय करणारे आहेत ते
- राज्याच्या मेंढी व लोकर विकास मंडळ/फेडरेशन/महामंडळ, समाजरत्न शिवाजीराव शेंडगे मेंढी व शेळी पैदासकार व लोकर विकास महामंडळ, पुणे, सहकारी संस्था, गैरसरकारी संस्थेचे सभासद आणि ज्यांना लोकर विकास मंडळ, जोधपूर यांनी मान्यता दिली आहे अशा संस्थेचे मेष पालक सभासद

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या पत्रकानुसार या योजनेमध्ये मेंढपाळांना मिळणारे लाभ

- सभासदाचा नैसर्गिक मृत्यु विमा संरक्षण - रु. ६०,०००/-
- अपघाती मृत्यु विमा संरक्षण - रु. १,५०,०००/-
- अपघातामध्ये कायम अपंगत्व आल्यास - रु. १.५०.०००/-
- अपघातामध्ये २ डोळे किंवा २ पाय गमावल्यास - रु. १,५०,०००/-
- अपघातामध्ये १ डोळा किंवा १ पाय गमावल्यास - रु. ७५,०००/-

### शिष्यवृत्ती फायदे

मेंढपाळ सभासदांच्या इयत्ता ९ ते १२ मध्ये शिकणा-या जास्तीत जास्त २ मुलांना दरमहा रु. १००/- याप्रमाणे शिष्यवृत्ती दर सहामाहीस देण्यात येणार आहे.

### आवश्यक कागदपत्रे

१. विहित नमुन्यातील पूर्णपणे भरलेला फॉर्म
२. रेशनकार्डची छायाप्रत
३. ग्रामपंचायतीमधील जन्म नोंदणी रजिस्टरमधील जन्मनोंदणी उतारा किंवा
४. शाळेच्या दाखल्यातील जन्मतारखेचा उतारा
   किंवा

५. मतदानाचे ओळखपत्र किंवा इतर संस्थांनी दिलेले ओळखपत्र (ज्यामध्ये वय किंवा जन्मतारीख नमूद केलेली आवश्यक आहे)

किंवा

६. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सक्षम अधिका-यांनी वयाबाबतचा दिलेला दाखला

मा.ना.श्री. शेंडगे, अध्यक्ष, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, यांनी या योजनेचा जास्तीत जास्त मेंढपाळांनी फायदा घ्यावा असे आवाहन केले आहे. या योजनेची अधिक माहिती जवळच्या मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्रामध्ये मिळू शकेल.

**अंतरा संस्थेने तयार केलेले शैक्षणिक साहित्य**

**गृहसंवर्धित जैविक विविधता (शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका)**

फ्लिप चार्ट
**महाराष्ट्रातील पाळीव जनावरांच्या जाती**

पोस्टर
**उपयुक्त गवत व तणे**
**उपयुक्त औषधी वनस्पती**

## पशु विमा योजना

विमा हे कुठल्याही प्रकारची हानी झाली तर त्याकरता संरक्षण मिळण्याचे माध्यम आहे. आयुर्विमा तर आजकाल सगळ्यांनाच परिचित आहे. परंतु पशुपालकांकरताही विम्याची सुविधा उपलब्ध आहे. त्याबद्दल व एकूण विम्याबद्दल थोडक्यात माहिती देण्याचा हा प्रयत्न.

**विमा म्हणजे काय? व तो का उतरवायचा?**

ज्या गोष्टीचा विमा उतरवायचा असेल व तो जितक्या रकमेकरता उतरवला असेल त्याकरता दरवर्षी एक ठराविक वार्षिक हप्ता विमा कंपनीला देण्याचे विमा उतरवणारी व्यक्ती मान्य करते. हप्त्याची रक्कम विमा कंपनीने ठरवलेली असते व ती जेवढ्या रकमेकरता विमा उतरवलेला असेल त्यावर ठराविक प्रमाणात अवलंबून असते. विमा उतरवल्याने, भविष्यकाळात जर काही नुकसान किंवा हानी झाली तर ज्या विमा कंपनीकडे हप्ते भरले असतील ती कंपनी, जेवढा विमा उतरवला असेल तेवढी रक्कम झालेल्या नुकसानाकरता भरपाई म्हणून परत देते.

आयुष्याकरता तसेच घर, वाहन, दुकान, चोरी, इत्यादिकरताही विमा योजना उपलब्ध आहेत. अलिकडेच, म्हणजे २० डिसेम्बर २००२ रोजी, ॲग्रिकल्चर इन्शुअरंस कंपनी ऑफ इंडिया लि.ची स्थापना झाली आहे. ह्या कंपनीचा उद्देश लहरी हवामान, कीटक व रोग पडून शेतीमध्ये झालेले मोठ्या प्रमाणावरचे

नुकसान टाळावे ह्या दृष्टीकोनातून विम्याद्वारे त्या संबंधात काळजी घ्यावी असा आहे. ॲग्रिकल्चर इन्शुअरंस कंपनी ऑफ इंडिया लि. विविध पीकांचा विमा उतरवते. त्यापैकी काही म्हणजे - आंबा, अफू, नारळ, औषधी वनस्पती, कॉफी, लगदा होणा-या लाकडाची झाडे, गहू, बटाटा, सफरचंद. ह्या योजनेखाली सध्यातरी पशुधनाचा समावेश नाही. तथापि, पशु विमा योजना स्थानिक पातळीवर उपलब्ध आहेत. ज्या कंपन्या पशु विमा उतरवतात त्यांची नावे अशी -

- नॅशनल इन्शुअरंस कंपनी
- ओरिएंटल इन्शुअरंस कंपनी
- युनायटेड इन्शुअरंस कंपनी
- न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनी
- बजाज आलीयांझ

काही वेळा जिल्हा ग्रामीण विकास प्राधिकरणही विम्याकरता मदत करते. तसेच सहकारी संस्था व बचत गटांमार्फतही विमा योजना उपलब्ध असू शकतात.

पशु विमा योजनांमध्ये, साथीच्या रोगांमुळे होणारे पशुंचे मृत्यु व अपघात तसेच महापूर व दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे ओढवणा-या संकटाविरुध्द रक्षण करण्याची सोय आहे. जर साथीच्या रोगामुळे जनावरे दगावली असतील व जर त्याकरता लसीकरण उपलब्ध असेल तर मात्र लसीकरण करुन घ्यायलाच हवे.

**विम्याची रक्कम मिळवण्याकरता लागणारी कागदपत्रे -**

- मालकाचा प्रस्ताव फॉर्म
- प्रमाणित पशुवैद्यकाचे जनावराच्या आरोग्यासंबंधीचे प्रमाणपत्र
- बँकेकडून कर्ज घेऊन जनावराची खरेदी केली असली तर बँकेचे पृष्ठांकन
- सरकारी योजनेतून जनावर मिळाले असले तर जिल्हा ग्रामीण विकास प्राधिकरणाचे पृष्ठांकन

सर्वसाधारणपणे विम्याच्या वार्षिक हप्त्याची रक्कम जनावराच्या किंमतीच्या ४% असते.

शेळ्यामेंढ्यांच्या संदर्भात, साधारणपणे, १० किंवा त्यापेक्षा जास्त संख्या असलेल्या कळपांचाच विमा उतरवला जातो.

जनावरांचे मूल्यांकन, साधारणपणे, त्यांचे वय, जात, उत्पादकता, लिंग (नर किंवा मादी), स्थानिक बाजारात असलेली मागणी, उत्पादनाची अवस्था यांच्या आधारावर केले जाते.

एकदा विमा उतरवला की त्यांना काहीतरी ओळखीची खूण द्यावी लागते. याकरता जनावराच्या कानात बिल्ला टोचता येतो किंवा डागता येते.

जर विम्याचा दावा करायचा असेल तर ओळखीची खूण तसेच विम्यासंबंधीचे सर्व कागदपत्र विमा कंपनीला सादर करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच दाव्याच्या कारणाची खात्री करुन घेण्याकरता प्रमाणित पशु-वैद्यकाकडून तपशीलवार तपासणी व जर जनावराचा मृत्यु झाला असेल तर शवविच्छेदन करुन घ्यायला हवे.

# गोष्ट मानसोली कोंबडीच्या काटकपणाची

कोकणात, पश्चिम किना-यावरच्या भरपूर पावसाच्या डोंगराळ प्रदेशात, सापडणारा लांबलचक मानेवर अजिबात पिसे नसणा-या मानसोली पक्ष्याचे मांस अत्यंत चवदार असल्याने, मेजवानीच्या वेळी त्याचा उपयोग केला जातो. महाबळेश्वर परिसरात वसलेल्या वेलंग या माझ्या मूळ गावी तीन वर्षापूर्वी महाडजवळील भोर तालुक्यातून मानसोली जातीच्या ३ ते ४ कोंबड्या व १ कोंबडा आजीने मायीस भेट म्हणून दिले. तीन वर्षात विक्री, मेजवानीकरता वापर करुनदेखील त्याचे रुपांतर ४० पक्ष्यांमध्ये झालले आहे.

मायीच्या दारात कोंबड्यांकरता घरगुती पध्दतीने बनवलेले तारेचे खुराडे आहे. सर्व पक्षी दिवसभर भोवतालच्या परिसरात मोकळे असतात व संध्याकाळी आत डालले जातात. बरेच दिवसापासून, म्हणजे साधारण एकदीड महिन्यांपासून एक मानसोली कोंबडी मेली की काय, कुत्र्याने पळवली की काय असे मायीच्या बोलण्यातून येत असे. मायीची कन्या काही दिवसापूर्वी दारातील नळावर भांडी धूत असताना तिला नळाशेजारील गांडूळ खताच्या बेडमधून चिवचिव असा आवाज आला. तिने लगेचच आवाजाच्या दिशेने चाहुल घेण्याचा प्रयत्न केला. पाहते तर काय? गांडूळ खताच्या बेडवर कोंबडीच्या १० छोट्या छोट्या कोंबडीची नुकत्याच १-२ दिवसात बाहेर पडलेल्या पिल्लांचे तिला दर्शन झाले. तिचा आनंद गगनात मावेना. पावसाने भिजू नये म्हणून गांडूळ खाताच्या बेडवर डोंगरी गवत पसरलेले होते ते बाजूला करुन, तिने अलगद पिल्ले उचलून घेतली. कोंबडी व पिल्ले दोघांनाही तिने एका सुरक्षित टोपलीत ठेवले. ह्या प्रसंगावरुन एक लक्षात येते की मानसोली कोंबडीला १० अंडी घालावयास लागलेला वेळ, पुन्हा १० पैकी १० अंडी उबवण्यास लागलेला २१ दिवसांचा काळ अशा एकूण दीड ते दोन महिन्याच्या कालावधीत माणसाच्या हस्तक्षेपाशिवाय व मदतीशिवाय पुर्नउत्पादनाच्या कामात ती गढून गेली होती. हे करत असताना अवकाळी पावसामुळे बेडवर पूर्णपणे झाकलेल्या गवताची मिळालेली उब फायदेशीर ठरली. परंतु, झाकलेल्या अवस्थेत २१ दिवस काही न खातापिता या कोंबडीने अंडी अत्यंत चांगल्या रितीने उबवून उत्कृष्ट मातेचे दर्शन घडवून दिले. एवढेच नव्हे, तर एक दिवस सकाळी पिल्लांसोबत कोंबडी टोपलीतून बाहेर सोडलेली असताना एक कावळा पिल्लांवर चाल करतो आहे हे पाहून कावळ्याला पाहताच ती माता तितक्याच त्वेषाने कावळ्याच्या दिशेने छताएवढी उंच उडालेली अंगणात उभ्या असलेल्या मायीनी पाहिली.

आत्तापर्यंत गावरान कोंबड्या पिल्लांकरता बसवल्या जात होत्या. पण ह्यापुढे अंडी उबवण्यास व मातृत्वात तितक्याच कडक व कार्यक्षम असलेल्या मानसोली जातीच्या कोंबड्यांदेखील अंडी उबवण्याकरता वापरण्याचा मनोदय मायींनी व्यक्त केला.

••

# शेळीमेंढीपालनासाठी कसे कर्ज मिळू शकेल

शेळी आणि मेंढीपालन व्यवसाय सुरू करण्यासाठी अनेक लोक उत्सुक असतात. परंतु, त्याच्याकडे पुरेशा प्रमाणात भांडवल उपलब्ध नसते. अशा परिस्थितीत त्यांना बँकेमार्फत कर्ज मिळू शकते. कर्जासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे व पात्र उमेदवार याविषयी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे -

**कर्जाचे स्वरुप : दीर्घ मुदतीचे कर्ज**

- **कर्जास पात्र असलेले अर्जदार** : लहान व अल्पभूधारक, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर, भागीदारीने शेती करणारे शेतकरी, कुळाने शेती करणारे शेतकरी आदी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेला वर्ग. कर्ज घेणाराला शेळीमेंढीपालनाचा अनुभव पाहिजे अथवा त्याने यासंबंधी प्रशिक्षण घेतले असले पाहिजे.
- **कर्जाची रक्कम** : नाबार्डच्या शिफारसी-नुसार. प्रकल्पामधील एकूण जनावरांची किंमतही लक्षात घेतली जाते.
- **कर्ज परतफेडीची मुदत** : ५ ते ६ वर्षे. पहिले १२ महिने मॉरेटोरियम (विसावा) कालावधी दिला जातो.
- **कर्जाचा हप्ता** : सहामाही किंवा वार्षिक हप्ता ठरवला जातो. (पहिल्या वर्षी व्याजाची रक्कम वसूल केली जाते.)
- **व्याज आकारणी** : मार्चमध्ये साध्या व्याजदराने आकारणी केली जाते. खाते नियमित असेल तर व्याजावर व्याज आकारले जात नाही.
- **तारण** : शेळ्यामेंढ्या नजरगहाण ठेवल्या जातात. पूरक तारण म्हणून शेतजमिनीवर बँकेचा बोजा नोंदवला जातो. कर्जाची रक्कम रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास दोन पतवान जामीनदार घेतले जातात.
- **मार्जिन (दुरावा)** : रुपये ५०,०००/- पर्यंत मार्जिन घेतले जात नाही. कर्जाची रक्कम रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास १०-१५% मार्जिन घेतले जाते.

**कर्जासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे**

- अर्जदार व दोन जामीनदारांचे मालकीचे जमिनीसंदर्भात ७/१२ व ८अ उतारे, फेरफार उतारे
- सरपंच/तलाठी/ग्रामसेवकाचा ना हरकत दाखला
- सहकारी पतसंस्था, बँकाकडून बेबाकी दाखला
- अर्जदार व जामीनदार यांची प्रत्येकी दोन छायाचित्रे, पॅनकार्ड/रेशनकार्डची झेरॉक्स प्रत
- व्यवसायासंबंधी प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केला असल्यास त्यासंबंधीच प्रमाणपत्र आगामी दोन-तीन वर्षाचे उत्पन्न खर्चाचे अंदाजपत्रक

या माहितीच्या आधारे संबंधित बँकेच्या प्रत्यक्षातील योजना शाखा अधिका-याकडून समजावून घ्याव्यात. काही बँकांच्या योजना, नियम, अटी व अंमलबजावणी यात बदल असू शकतो. राष्ट्रीयीकृत बँकेच्या कर्ज योजना व नियम थोड्याफार फरकाने सारखेच असतात.

••

## दोन कविता

श्री. शाम बहादूर नम्र हे मध्य प्रदेशातले एक गांधीवादी शिक्षणतज्ञ असून त्यानी आदिवासी मुलांबरोबर ३० वर्षाहून अधिक काळ काम केले आहे. त्यांनी प्राथमिक शिक्षणक्रमाचा भाग म्हणून अनेक कविता लिहिल्या आहेत. त्यापैकी दोन कवितांचा स्वैर अनुवाद

### होमवर्क

एक मुलगी जात नाही शाळेत
ती जाते घेऊन बक-यांना चरायला
दिवसभर लाकडे गोळा करून आणते
मग आईबरोबर लावते भात शिजायला

एक मुलगी पाठीवर ओझं घेऊन शाळेला जाते
सायंकाळी दमूनभागून घरी परत येते
शाळेत भरपूर होमवर्क मिळते
आई-वडिलांना ते करायला लावते

पुस्तकं असोत वा लाकडं असोत
दोन्ही मुली ओझच उचलतात
पण लाकडं आणली तर पेटेल चूल, भरेल पोट
लाकडं आणणा-या मुलीला आहे याची चांगली जाण
लाकडं किती उपयोगी आहेत याचे आहे तिला ज्ञान

पुस्तकात दिलेले केव्हा कुठे उपयोगी पडणार
शाळेत जाणारी मुलगी न समजता पाठांतर करणार
अशा पुस्तकी ज्ञानाचा कुठे फायदा होणार

बक-या चारणे, लाकडं गोळा करणे
आईबरोबर भात शिजवणे
ही सगळी खरी घरची कामे
याला कुठे म्हणतात होम वर्क
पण शाळेत मिळालेला धड्यावरचा गृहपाठ
न का असेना हे घरचे काम, म्हणतात मात्र यालाच
होमवर्क

अस कधी होईल का
पुस्तके खरच होम वर्कशी (घरच्या कामाशी) जोडली
जातील का
तसच लाकडं गोळा करणारी मुलगी
अशी पुस्तके वाचेल का

### स्वच्छतेचे महत्व

काळू माकड आले नाचत
तोंडात केळी सोलून टाकत
परंतु हात नव्हते धुतलेले
त्यामुळे रोगाला आमंत्रण गेले
झाली इथूनच सुरूवात कहाणीला
काळू माकडाच्या आजारी पडण्याला

सगळा हुल्लडपणा विसरून गेला
अंगात ताप सणकून भरला
पोटात कळा यायला लागल्या
जुलाब-उलट्या सुरू झाल्या

डॉक्टर कोल्होबा धावत आले
कडू औषधाचे डोस पाजले
काळूला म्हणाले, तोंड उघडा, जीभ दाखवा
तुमच्या आजाराचा शोधतो पुरावा
हात न धुता खाल्लेत न!
आता खा चूर्ण, घ्या इंजेक्शन

हे ऐकल्यावर काळू पळाला धूम
त्याला पकडायला कोल्होबा झाले घामाघूम
पकडून काळूला टोचली सुई
काळू कळवळला उई उई

विचार केल्यावर पश्चाताप झाला
आपल्याच करणीचे फळ पावला

❖❖

## अंतरातील घडामोडी

- सृजन संस्थेला अंतरातर्फे कोंबडीपालन, शेळीमेंढी व मोठी गुरे यांचे व्यवस्थापन व संगोपन या विषयावर एप्रिल ते सप्टेंबर २००९दरम्यान तीन प्रशिक्षण कार्यक्रम
- अंतराच्या 'दख्खन पठारावरील मेंढीपालन'या पुस्तकाला बळीराजातर्फे नारायण खेडकर प्रथम पुरस्कार
- संगीता व नथू या अंतराच्या कार्यकर्त्यांनी गोमुख संस्थेकरता कोळवण येथे परसदारातील कोंबडीपालनाचे प्रशिक्षण दिले
- 'उर्जा व हवामान बदल' या विषयावर लडाख येथे २०-२३ एप्रिल २००९ला भरलेल्या संमेलनात डॉ. नित्या घोटगे यांचा पेपर सादर
- जागतिक पशुवैद्यक दिनानिमित्त २५ एप्रिल २००९ ला ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानामार्फत डॉ. नित्या घोटगे यांचा सत्कार
- अंतरामध्ये बर्न विद्यापीठ, स्वित्झरलँड येथून आलेल्या रोझाली या स्वयंसेविकेची दख्खनी मेंढ्यांच्या जातीसंबंधात अंतराच्या कार्यक्षेत्रांना भेट
- अंतराच्या सर्व स्टाफने रोपवाटिकेत एक एक रोप लावून जागतिक पर्यावरण दिवस साजरा केला
- वेणूमाधुरी संस्था, कोल्हापूर यांनी राधानगरी येथे आयोजित केलेल्या बेंदूर उत्सवात डॉ. सचिन यांचा सहभाग
- कोरडवाहू व वाळवंटी प्रदेशातल्या उद्योजकांची क्षमता वाढविणे या विषयावर जोधपूर येथे ११-१२ जुलै २००९ला भरलेल्या संमेलनात अंतरातर्फे डॉ. गायत्री राजूरकरांचा सहभाग
- अंतराच्या फलटण केंद्रात पशुदूत प्रशिक्षण या नवीन उपक्रमांतर्गत १५ पुरूष व ३ महिला मेंढपाळांचे प्रशिक्षण संपन्न
- विमेन्स ॲक्शन फॉर डेव्हलपमेंट, भरतपूर, राजस्थान येथील महिलांना डेअरीकरता पशुपालन व पारंपरिक उपचार पध्दती यावर डॉ. गाय़त्री व स्मिता यांनी प्रशिक्षण दिले
- डॉ. रेड्डीज् लॅबॉरेटरी फाउंडेशनसाठी अंतरा संस्थेतील डॉ. गायत्री व संगीता यांची दौंड तालुक्यातील काही गावांना परसदारातील कोंबडीपालनासंबंधी परिस्थितीचा आढावा घेण्याकरता भेट
- स्थलांतरावरून परतलेल्या महिलांसाठी अंतराच्या कामाची ओळख करुन देण्याकरता साल्पे व तडवळे या फलटणजवळील गावात कार्यक्रम
- व्यावसायिक कोंबडी पशु कल्याण व पशुपालनातील उत्तम प्रथा यांच्या संदर्भात अंतराने संशोधन कार्यक्रम हाती घेतला आहे
- अंतराच्या संचालक मंडळावर डॉ. सुमी कृष्णा व श्रीमती पॅट्रिशिया गोखले यांची नियुक्ती

••

## पशुपालक व शेतकऱ्यांसाठी अंतरा संस्थेची काही उपयुक्त प्रकाशने

सह्याद्रीतील चारा संपत्ती
परसदारातील कोंबडीपालन
जनावरांसाठी निवारा
चला शेळ्या पाळू या
खुराक व चांगले आरोग्य
जनावरांसाठी वनस्पती औषधी व उपचार
दख्खन पठारावरील मेंढीपालन

### *पोस्टर*

दूध काढताना घ्यावयाची काळजी
प्रथमोपचार
लसीकरण

बुक-पोस्ट

प्रति,

**अंतरा**
एफ, लँटाना गार्डन्स, एन.डी.ए. रस्ता,
बावधन, पुणे ४११ ०२१, महाराष्ट्र
दूरध्वनी : (२०) २२९५३५४६, २२९५३५४७
ईमेल : anthra.pune@gmail.com
वेबसाईट : www.anthra.org